**औरंगाबाद येथे हज हाऊस इमारतीचे**
**बांधकाम करण्यास मान्यता देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : हज-२००९/ प्र.क्र.५८/०९/का.५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २२ जानेवारी, २०१०

**प्रस्तावना** :-

औरंगाबाद येथून हज यात्रेस प्रयाण करणा-या यात्रेकरुंकरिता केंद्र शासनाने सन २००५ पासून औरंगाबाद ते जेद्दाह अशी थेट विमानसेवा उपलब्ध करुन दिली आहे. या सेवेचा लाभ मराठवाडयातील ८ जिल्हयातील हज यात्रेकरु घेतात. दरवर्षी औरंगाबाद येथून सुमारे २५०० यात्रेकरु हज यात्रेस प्रयाण करतात. या यात्रेकरुंना मोफत निवास, प्रयाण व आगमनविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी औरंगाबाद येथे हज हाऊस उभारण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद येथून हज यात्रेस प्रयाण करणा-या यात्रेकरुंची लक्षणीय संख्या विचारात घेता, या यात्रेकरूंना प्रयाण तसेच आगमनानंतर मोफत निवास व इतर प्रवासानुषंगिक सुविधा उपलब्ध करुन देण्यसाठी कायमस्वरुपी हज हाउस उभारण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात औरंगाबाद येथे दिनांक २५.०८.२००९ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकित पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेतः-

**शासन निर्णय :-**

अ) औरंगाबाद येथून हज यात्रेस प्रयाण करणा-या यात्रेकरुंच्या सुविधेकरीता हज हाउस इमारतीचे बांधकाम करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात येत आहे,

ब) सदरहु हज हाउसच्या इमारत बांधकामासाठी येणा-या अंदाजित खर्चापैकी सन २००९-१० या आर्थिक वर्षात रु. ४.०० कोटी (रुपये चार कोटी फक्त ) इतकी तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे त्याचप्रमाणे,

क) औरंगाबाद येथून हज यात्रेस प्रयाण करणा-या यात्रेकरुंच्या सुविधेकरीता हज हाउस इमारतीचे बांधकाम करण्यासाठी "सिडको" (सिटी अॅण्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि.) या शासकीय अभिकरणाच्या नियुक्तीसही याव्दारे तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

औरंगाबाद येथे हज हाउस इमारतीच्या बांधकामास प्रशासकिय मान्यता देण्याच्या दृष्टीने याबाबतचा बांधकाम नकाशा व चालू दरसूचीवर आधारित अंदाजपत्रक "सिडको" या शासकीय अभिकरणाकडून तयार करवून घेवून व प्रमाणित करवून घेवून ते शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावे. सदर बांधकामाकरीता निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष बांधकामास सुरवात करु नये.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००१२५१६३७०५००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(खालिद बी.अरब )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मंत्री/राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
जिल्हाधिकारी , औरंगाबाद
**व्यवस्थापकीय संचालक**, सिडको,बेलापूर, सिडको, नवी मुंबई
**मुख्य प्रशासक**, सिडको, औरंगाबाद
**मुख्य कार्यकारी अधिकारी,** महाराष्ट्र राज्य वक्फ महामंडळ,पानचक्की, औरंगाबाद.
**कार्यकारी अधिकारी,** महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
**मुख्य कार्यकारी अधिकारी,** केंद्रीय हज समिती, ७-अ, एम.आर.ए.मार्ग, मुंबई
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर,
कोषागार अधिकारी, औरंगाबाद
उप सचिव, वित्त विभाग/व्यय-४, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, नियोजन विभाग/का.१४/११, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२५, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग/ मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कार्या-५).